**<u>सी.एन.आर. नं. एमएचएसआय ०७ —०००४२८—२०१८</u>**

**<u>नि.दि.मु.क्र. ८०/२०१८ मधील नि.क्र. ५८ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा दावा हक्कप्रस्थापना व वाटप होवून मिळणेसाठी दाखल करण्यात आलेला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द नि.क्र. १ वर दावा विनाकैफियत चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल होवून कैफियत स्वीकारणेचा आदेश होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जातील नमूद कारणांचा विचार होवून अर्ज मंजूर करण्यात यावा असे सदर प्रतिवादीतर्फे नमूद करण्यात आलेले आहे. वादींनी प्रस्तुत अर्जाकरीता थोडक्यात असे म्हणणे सादर केलेले आहे की, अर्ज खोटा आणि खोडसाळ आहे. प्रतिवादीने जाणीवपुर्वक कैफियत देण्यास वेळ लावलेला आहे. आदेश रद्द करणेबाबत कोणतेही समर्पक स्पष्टीकरण नमूद नाही. झालेला आदेश योग्य आणि पुरेशी संधी देवूनच केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती वादींनी केली आहे.

०३. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले असता; नि.क्र. १ वर दावा प्रतिवादी क्र. १ याच्या कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा आदेश दि. ०५/०२/२०१९ रोजी पारीत झालेला आहे. सदरील आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी सदर प्रतिवादीने दि. ०५/०३/२०१९ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जातील नमूद कारणे पाहता ती प्रथमदर्शनी संयुक्तिक असल्याचे कोठेही दिसून येत नाही. तरीपरंतु दाव्यातील वादींची अंतिम मागणी पाहता सदर प्रतिवादीची कैफियत प्रस्तुतकामी दाखल झाल्यास प्रस्तुतच्या दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर करणे सुलभ होणार आहे. तथापि; सदर प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास केलेला विलंब पाहता; त्याचेवर रक्कम रुपये १००/— इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादींना देवविण्याचा आदेश करणे उचित राहील. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज प्रतिवादी क्र. १ याच्यावर रक्कम रु. १००/— (रक्कम रुपये

शंभर मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. १ वरील दि. ०५/०२/२०१९ रोजी प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द दावा कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ याने वादींना पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक : ०५ मार्च, २०१९ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.